पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/०७/२०१७** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०७/०७/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सोनवणे शारदा हिरेन - सभापती**
२. मा.अश्विनी संतोष जाधव - उपसभापती
३. मा.स्वीनल कपिल म्हेत्रे
४. मा.भोईर सुरेश शिवाजी
५. मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत
६. मा.कोकणे संतोष अंकुश
७. मा.यादव मीनल विशाल

या शिवाय मा.डोईफोडे – सहा.आयुक्त, मा.इंदलकर - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.३) मनपाचे सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामधील ब क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाच्या महसुली कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव.

---------

दिनांक **१६/०६/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – १४ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०७/०७/२०१७ विभाग – प्रशासन

सुचक – मा.अश्विनी जाधव अनुमोदक – मा.मीनल यादव

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/३८१/२०१७, दि.१५/०६/२०१७

विषय – " कान-नाक-घसा तज्ज्ञ " अभिनामाचे पद सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी कर्मचारी निवड समितीने शिफारस केलेल्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना नियुक्ती देण्यास मान्यता मिळणेबाबत.

विषय क्रमांक ०१ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

----------

ठराव क्रमांक – १५ विषय क्रमांक – ०२

दिनांक – ०७/०७/२०१७ विभाग – प्रशासन

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.स्वीनल म्हेत्रे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/२/कावि/३१७/२०१७, दि.३०/०६/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ग्रामपंचायत सेवेमधून वर्ग झालेल्या कर्मचा-यांपैकी १० वर्ष सेवा पूर्ण न झालेल्या तथापि दहा वर्ष सेवा पूर्ण होण्यासाठी एक वर्षापर्यंत कमी सेवा कालावधी असलेल्या कर्मचा-यांचीमाहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव व पदनाम | मनपाकडील नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | मनपामधील एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई | ०३/१२/१९९७ | ३१/१२/२००६ | ९ वर्षे २९ दिवस |
| २. | श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई | ०३/१२/१९९७ | २८/०२/२००७ | ९ वर्षे २ महिने २९ दिवस |

श्री.भालेकर सदाशिव घमाजी यांनी त्यांचे दि. -/०७/२०१५ चे पत्रात (दि.१९/१०/२०१५ रोजी आवक) नमूद केलेल्या बाबी व त्या अनुषंगाने केलेले मागणीचे अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्षे सेवा पुर्ण होणेचे दृष्टीने मा.शासनामार्फत श्री.भालेकर सदाशिव घमाजी व श्री.बिडकर तुकाराम बन्सी यांच्या सेवेत भर घालण्यास मान्यता दिल्यास सदर कर्मचा-यांना निवृत्ती वेतन व इतर आर्थिक फायदे अदा करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आर्थिक भार उचलणेस तयार असलेबाबत व प्रकरणी शासनाचे अभिप्राय / मार्गदर्शन मिळणेकामी इकडील पत्र क्र.प्रशा/०२/कावि/१७६/२०१६ दि.०२/०५/२०१६ अन्वये शासनास पत्र दिले आहे. त्यावर शासनाने पत्र क्र.पीसीसी-३०१६/प्र.क्र.३४८/नवि-२२ दि.२५ ऑक्टोबर,२०१६ अन्वये कळविले आहे **की "मा.शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश**

**व नियम तपासून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिकेच्या स्तरावर उचित निर्णय घ्यावा,तथापि कोणताही निर्णय घेतल्यामुळे समस्या उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी ”**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन)नियम १९८२ मधील प्रकरण ५ (अर्हताकारी सेवा) मधील ५४(२) मध्ये खालीप्रमाणे तरतूद आहे. **“ सेवानिवृत्त होणा-या शासकीय कर्मचा-याने निवृत्तीवेतनासाठी केलेल्या अर्हताकारी सेवेच्या कालावधीमध्ये, शासन सामान्यत:एक वर्षाहून अधिक नसेल इतक्या मुदतीची भर घालू शकेल आणि ही मुदत या नियमाच्या तरतूदीनुसार निवृत्तीवेतनासाठी हिशेबात घेता येईल. ”**

प्रस्तुत प्रकरणी शासनाने यापूर्वी मनपास दि.२५/१०/२०१६ चे पत्रान्वये वरीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे. त्यामध्ये शासनाने प्रस्तुत प्रकरणी महापालिकेनेच त्यांचे स्तरावर उचित निर्णय घेणेबाबत कळविले आहे. त्यामुळे श्री. भालेकर सदाशिव घमाजी, शिपाई (सेवानिवृत्त) व श्री.बिडकर तुकाराम बन्सी, शिपाई (सेवानिवृत्त) यांच्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील १० वर्ष सेवा पूर्ण होणेचे दृष्टीने व निवृत्तीवेतनाकरीता किमान सेवा कालावधी पूर्ण होणेच्या दृष्टीने या दोन्ही कर्मचा-यांना निवृत्तीवेतन अदा करणेसाठीचा आर्थिक भार उचलण्यास महानगरपालिका तयार असल्यास या दोन कर्मचा-यांच्या सेवेत एक वर्षापर्यंत भर घालणे अथवा शिथिल करणेस व तदनंतर निवृत्तीवेतन अदा करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला.**

ठराव क्रमांक – १६ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ०७/०७/२०१७

सुचक – मा.सुरेश भोईर अनुमोदक – मा.अश्विनी जाधव

संदर्भ – मा.सुरेश भोईर, मा.अश्विनी जाधव यांचा प्रस्ताव –

मनपाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकास मा.मनपा सभेची नुकतीच मान्यता मिळालेली आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये ब क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील महसुली कामांसाठी अंदाजपत्रक पुस्तकामध्ये अंदाजपत्रकीय रकमेच्या रकान्यामध्ये नजरचुकीने शुन्य रक्कम छापुन आलेली आहे. मा.मनपा सभेमार्फत अंदाजपत्रकास मंजूरी देताना भांडवली व महसुली कामांचे नमुद असलेल्या अंदाजपत्रकीय रकमेस एकत्रित प्रशासकीय मान्यता देणेत येते. तथापि ब क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विषयक महसुली कामांना अंदाजपत्रकीय रक्कम नमुद न झाल्याने सदर कामांना मा.विधी समिती मार्फत स्वतंत्र प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पानांक | कामाचा अ.क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | वॉर्ड क्र. | कामाची अंदाजपत्रकीय र. | सन १६-१७ चा सुधारीत अंदाज | सन १७-१८ चा मुळ अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ७०३ | २५ | प्रभाग क्र.१७ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | १७ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०२ | | २६ | प्रभाग क्र.१८ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | १८ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०३ | | २७ | प्रभाग क्र.१९ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | १९ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०४ | | २८ | प्रभाग क्र.२३ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | २३ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०५ | | २९ | प्रभाग क्र.२४ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | २४ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०६ | | ३० | प्रभाग क्र.२५ मधील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती हॉटमिक्स पध्दतीने करणे. | २५ | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| ०७ | | ३१ | ब प्रभागांतर्गत खड्डे, ट्रेचेस कोल्ड मिक्स पध्दतीने भरणे. | स. सा. | २७,००,००० | ० | १८,००,००० |
| ०८ | ७०७ | ४८ | प्रभाग क्र.१७ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे. | १७ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| ०९ | | ५० | प्रभाग क्र.१९ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे. | १९ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १० | | ५१ | प्रभाग क्र.२३ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे. | २३ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| ११ | | ५२ | प्रभाग क्र.२४ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे. | २४ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १२ | | ५३ | प्रभाग क्र.२४ मधील मनपा महापालिका इमारतीची दुरुस्ती करणे. | २५ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १३ | | ५४ | प्रभाग क्र.१८ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची दुरुस्ती करणे. | १८ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १४ | | ५५ | प्रभाग क्र.२३ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची दुरुस्ती करणे. | २३ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १५ | | ५६ | प्रभाग क्र.२४ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची दुरुस्ती करणे. | २४ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १६ | | ५७ | प्रभाग क्र.२५ मधील महानगरपालिकेच्या शाळा इमारतीची दुरुस्ती करणे. | २५ | ३०,००,००० | ० | २०,००,००० |
| १७ | | ६४ | प्रभाग क्र.२५ मधील वाकड भागातील फुटपाथ, डिव्हायडर, स्ट्रॉम वॉटर, पेव्हिंग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २५ | २७,००,००० | ० | १८,००,००० |
| १८ | | ६५ | प्रभाग क्र.२५ मधील ताथवडे, पुनावळे भागातील फुटपाथ, डिव्हायडर, स्ट्रॉम वॉटर, पेव्हिंग ब्लॉकची व नाल्यांची दुरुस्ती करणे. | २५ | २७,००,००० | ० | १८,००,००० |
| १९ | | ६६ | प्रभाग क्र.१८ मधील श्रीमान महासाधु मोरया गोसावी संजीवनसमाधी उत्सवासाठी मंडळ व्यवस्था करणे. | १८ | २७,००,००० | ० | १८,००,००० |
| २० | | ६७ | ब प्रभागा अंतर्गत गणपती विसर्जन सोहळयासाठी मंडप व्यवस्था करणे. | स. सा | १५,००,००० | ० | १०,००,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | ७०८ | ६८ | रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था करणे | १९ | १५,००,००० | ० | १०,००,००० |
| २२ | | ६९ | ब प्रभागातील रुग्णालयांची दुरुस्ती करणे. | स. सा | ३७,५०,००० | ० | २५,००,००० |
| **एकूण -** | | | | | ६,७०,५०,००० | ० | ४,४७,००,००० |

मनपाचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये नमुद असलेल्या ब क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य विभागाकडील महसुली कामांना प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सोनवणे शारदा हिरेन )**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/९५३/२०१७
दिनांक : ११/०७/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2017 sub committee sabhapati.doc